# अध्यात्माची गोडी लावणारा सोहळा -पालकमंत्री बोर्डीकर



**सेलू -** वडीलधाऱ्या माणसांना अध्यात्माची आवड असतेच. पण पुढच्या पिढीलाही अध्यात्माची गोडी लावणारा हा फिरता ज्ञानेश्वरी पारायण सांगता सोहळा आहे. शिस्तबद्ध नियोजनात संपन्न होणाऱ्या या सोहळ्यातून प्रत्येक जण समाधान घेऊन जातो आहे, असे प्रतिपादन जिल्ह्याच्या पालमकमंत्री मेघना बोर्डीकर साकोरे यांनी बुधवारी (दि. १८ ) रोजी फिरता ज्ञानेश्वरी पारायण सांगता सोहळ्यात मनोगत व्यक्त करताना केले.

अलंकापुरी नगरीत आयोजित फिरता ज्ञानेश्वरी पारायण सांगता सोहळ्यात पुढे बोलताना पालकमंत्री मेघना बोर्डीकर साकोरे म्हणाल्या की, आजच्या काळात नामस्मरणाची गोडी असल्याशिवाय आपल्या मनाला, संसाराला समाधान मिळणार नाही. आपली सर्व तिर्थक्षेत्र, ऊर्जाक्षेत्र विकासाची कामे शासनाने हाती घेतली आहेत. जिल्ह्यातील ३०० च्यावर असलेल्या हेमाडपंथी मंदिराचा जीर्णोद्धार करण्यासाठी केंद्र - राज्याचा निधी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला जातो आहे. नामस्मरणातून मिळणारी ऊर्जा रोजच्या जीवनातील समस्या, अडचणींना पार करण्याची शक्ती देते. अशा पारायण सोहळा, कार्यक्रमातून हे सर्व सहजशक्य होते. आपण भारतीय म्हणून एकत्र राहाण्याची गरज आहे. पर्यावरण संतूलनाचे खूप मोठे आव्हान आपल्यासमोर आहे. यादृष्टीने पारायण सांगता सोहळ्यातून दिला गेलेला प्लास्टिकमुक्तीचा संदेश खुप महत्वाचा आहे, असेही मेघना बोर्डीकर साकोरे म्हणाल्या.

या वेळी हभप ज्ञानेश्वर माऊली कदम, सावता महाराजांचे सतरावे वंशज, फिरता ज्ञानेश्वरी पारायण सांगता सोहळा ज्यांच्या संकल्पनेतून साकारला ते हभप पंडित महाराज डाके, अविनाश बिहाणी, संजय साडेगावकर यांची विशेष उपस्थिती होती. सुत्रसंचलन प्रा. संजय पिंपळगावकर यांनी केले.

# वाल्हा येथे धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या बलिदान मासाचे पालन



**(नवनाथ गव्हाणे / दै.धर्मयोध्दा)**

**बदनापुर -** धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या बलिदान मासानिमित्त वाल्हा गावात भावपूर्ण व उत्साहपूर्ण वातावरणात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी गावातील तरुण, महिला व पुरुष मोठ्या संख्येने एकत्र येत महाराजांच्या शौर्यगाथा आणि बलिदानाची आठवण जागवली.

कार्यक्रमादरम्यान उपस्थितांनी शिस्तबद्ध पद्धतीने बसून महाराजांना अभिवादन केले. तसेच त्यांच्या अद्वितीय पराक्रम, स्वाभिमान आणि धर्मरक्षणासाठी दिलेल्या बलिदानाची माहिती देण्यात आली. गावातील युवकांनी एकजुटीचा संदेश देत समाजात देशभक्तीची भावना जागृत ठेवण्याचा निर्धार व्यक्त केला.

या प्रसंगी परिसरात भक्तीमय आणि प्रेरणादायी वातावरण निर्माण झाले होते. अशा उपक्रमांमुळे नव्या पिढीला इतिहासाची ओळख होत असून, समाजात एकात्मता आणि राष्ट्रप्रेम वृद्धिंगत होत असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# पूर्णा पोलीसांकडून दोन जबरी चोरीचा पडदाफाश

## पाच आरोपी जेरबंद, साडेआठ लाखाचा मुद्देमाल जप्त




**पुर्णा-** येथील मागील आठ दिवसांमध्ये शहरात रेल्वेस्थानक परिसरात घडलेल्या दोन जबरी चोऱ्यांचा पूर्णा पोलिसांकडून पडदाफास करत एकूण पाच आरोपींना ताब्यात घेतले आहे. त्यांच्याकडून सहा दुचाकी व अकरा मोबाईल असा सुमारे साडेआठ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. तसेच चोरट्यांना जेरबंद करून येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांच्यासमोर हजर केले असता न्यायालयाने पाच दिवसांची पोलीस कोठडी दिली.

पूर्णा शहरातील रेल्वेस्थानक शास्त्रीनगर परिसरामध्ये १३ मार्च रोजी रात्री आठ वाजण्याच्या सुमारास अलंकारनगर येथील व्यावसायिक मनोहर सोपान माघाडे यांची रस्त्यामध्ये दुचाकी अडवून त्यांच्याकडून दुचाकी मोबाईल व काही रक्कम लुबाडून त्यांना बेदम मारहाण केल्याची घटना घडली होती. ही घटना घडताच १६ मार्च रोजी पुन्हा रात्री रेल्वेस्थानक परिसरात तालुक्यातील माटेगाव येथील आत्माराम ज्ञानदेव बोबडे यांना मारहाण करून मोबाईल हिसकावून घेतला होता. या दोन्ही प्रकरणी पूर्णा पोलीसांत गुन्हा दाखल करण्यात आला होता. पोलीस अधीक्षक रवींद्रसिंह परदेशी, अप्पर पोलीस अधीक्षक सुरज गुंजाळ, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. समाधान पाटील यांच्या मार्गदर्शनात पोलिस निरीक्षक विलास गोबाडे, तपास अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक गजानन पाटील यांनी तपासाची चक्री वेगाने फिरून प्रारंभी शहर परिसरात माघाडे यांच्या चोरीच्या छडा लावत आरोपी आयुष राजेंद्र बरकुंटे रा. शास्त्रीनगर, अंकित संजय गायकवाड रा. भीमनगर, श्रीनिवास रमेश गाडवे या कोळीवाडा यांना जेरबंद केले. पोलिसांनी खाक्या दाखवताच सहा दुचाकी, सहा मोबाईल चोरल्याची कबुली दिली.

दरम्यान बोबडे यांच्या प्रकरणातील दोन आरोपींचा सुगावा पोलिसांनी लावला. त्यांना ताब्यात घेऊन पुण्यात असलेले पाच मोबाईल अझान मगदूम पठाण रा. ढोबी मोहल्ला, राहुल थोरात रा. विजयनगर यांच्याकडून हस्तगत केले. चोरट्यांना पूर्णा प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी गजानन जानकर यांच्यासमोर हजर केले असता गुन्ह्यातील तीन आरोपींना पाच दिवसाची व दोघांना तीन दिवसाची पोलीस कोठडी सुनावली आहे.

ही कारवाई फौजदार प्रकाश इंगोले, फौजदार श्रीनिवास पडलवार, पो. कॉ. शेख ताजुद्दीन, पो. कॉ सुरेश राठोड, पो.कॉ रमेश छोटेवाड, पो. कॉ.अजय माळकर, पो. कॉ. सुरेश चव्हाण, पो. कॉ सुधीर काळे, पोलीस कॉन्स्टेबल माधव अक्कलवाड आदींनी परिश्रम घेतले

दरम्यान, माध्यमांशी बोलताना उपविभागीय पोलिस अधिकारी डॉ. समाधान पाटील, पोलीस निरीक्षक विलास गोबाडे यांनी आणखी गुन्हा उकलण्याची शक्यता वर्तवली आहे.

# घनसावंगी तालुक्यातील गारपीटग्रस्त शेतकऱ्यांना तात्काळ मदतीची मागणी



**(बाळासाहेब ढेरे /दै.धर्मयोद्धा)**

**घनसावंगी-** तालुक्यात दि. १९ मार्च २०२६ रोजी झालेल्या अवकाळी पाऊस व गारपीटीमुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून बाधित शेतकऱ्यांना तात्काळ नुकसान भरपाई देण्याची मागणी करण्यात आली आहे. शिवसेना शिव उद्योग सहकार सेनेचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष श्री. रामेश्वर पा. वाडेकर यांनी तहसीलदार, घनसावंगी यांना निवेदन देत ही मागणी केली आहे. या निवेदनात त्यांनी नमूद केले की, अचानक झालेल्या पावसासह गारपीटीमुळे गहू, ज्वारी, हरभरा यांसारख्या रब्बी पिकांसह आंबा व इतर फळबागांचे मोठे नुकसान झाले आहे. अनेक ठिकाणी पिके जमीनदोस्त झाली असून शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या शेतातील पंचनामे तात्काळ करून शासनाकडून आर्थिक मदत देण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच विमा कंपन्यांनीही त्वरित नुकसान भरपाई देण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करावी, अशी सूचना संबंधित यंत्रणेला देण्यात यावी, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. यावेळी पंढरीनाथ उगले, सर्जेराव जाधव, डिगांबर ढेरे, रमेशराव काळे यांच्यासह पदाधिकारी व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. दरम्यान, या गंभीर परिस्थितीची दखल घेऊन शासनाने लवकरात लवकर मदत जाहीर करावी, अशी अपेक्षा शेतकरी वर्गातून व्यक्त होत आहे.

# दुटका येथील भ्रष्टाचाराविरोधात आंदोलन तीव्र होणार; ७ दिवसांत कारवाईचा अल्टिमेटम

**परभणी -** दि. २० मार्च २०२६ दुटका ता. पालम जि. परभणी येथील विविध विकास कामांमधील अनियमितता व भ्रष्टाचाराच्या निषेधार्थ सामाजिक कार्यकर्ते तिरुपती वैजनाथ शिंदे पाटील व ग्रामस्थ गेल्या पाच दिवसांपासून जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी येथे उपोषणाला बसले होते. आज या उपोषणास मराठा सेवा मंडळ व सकाळ मराठा समाज यांच्या वतीने भेट देऊन पाठिंबा देण्यात आला. यावेळी मराठा सेवा मंडळाचे संस्थापक अध्यक्ष नितीन देशमुख व मराठा समन्वयक बालाजी मोहिते यांनी आंदोलकांची भेट घेऊन त्यांच्या मागण्यांना जाहीर पाठिंबा दिला. दरम्यान, ग्रामविकास अधिकारी अन्नपूर्णा निवृत्ती डाखोरे व सरपंच सरस्वती सदाशिव डुकरे यांच्याविरुद्ध झालेल्या आरोपांबाबत सखोल चौकशी करून ठोस कारवाई करावी, या प्रमुख मागण्यांसह मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद परभणी यांना निवेदन सादर करण्यात आले. संबंधित प्रकरणात दोषींवर तात्काळ गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी करत प्रशासनाला ७ दिवसांचा अल्टिमेटम देण्यात आला. या इशाऱ्यानंतर प्रशासनाने तातडीने दखल घेत मुख्य कार्यकारी अधिकारी कार्यालयाकडून पत्र देऊन उपोषण मागे घेण्याची विनंती केली. उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या पुढाकाराने हे उपोषण तात्पुरते स्थगित करण्यात आले आहे. मात्र, येणाऱ्या ७ ते ८ दिवसांत मागण्यांवर ठोस कार्यवाही झाली नाही, तर मराठा सेवा मंडळ व सकाळ मराठा समाजाच्या वतीने जिल्हा परिषद परभणी येथे मोठ्या प्रमाणावर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे. तसेच या प्रकरणाकडे दुर्लक्ष झाल्यास कायदा व सुव्यवस्था बिघडल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी शासन व प्रशासनाची राहील, असा स्पष्ट इशारा देण्यात आला आहे.या वेळी गावातील सहकारी विलास सोनाजी काकडे, भुजंग दौलत काकडे, देवा पाटील शिंदे, आर्यन शिंदे, तिरुपती शिंदे, मारोती शिंदे, निळकंठ काकडे, विलास काकडे, गणेश शिंदे, विजय शिंदे, राजेश शिंदे, रामराव शिंदे, चंद्रकांत काकडे, नवनाथ काकडे, मारोती काकडे यांची उपस्थिती होती

# ताडकळसात ईदगाह येथे ईद-उल-फितर नमाज शांततेत पार; बंधुभावाचे दर्शन

**(वजीर पठाण / दै.धर्मयोध्दा)**

**ताडकळस-** पूर्णा तालुक्यातील ताडकळस येथे पवित्र रमजान महिन्याच्या समाप्तीनंतर साजऱ्या होणाऱ्या ईद-उल-फितर निमित्त ईदगाह येथे सकाळी ठीक ९ वाजता नमाज-ए-ईदुल-फितर नमाज पठण शांततेत व उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. महिनाभर उपवास, संयम, नमाज आणि इबादतीनंतर मुस्लिम बांधवांनी अल्लाहप्रती कृतज्ञता व्यक्त करत ईदची विशेष नमाज अदा केली. ईद-उल-फितर हा सण बंधुता, प्रेम, शांतता आणि दानधर्माचा संदेश देणारा असून, समाजात



ऐक्य आणि सौहार्द टिकवण्याचे महत्त्व यावेळी अधोरेखित करण्यात आले. नमाजपूर्वी फितरा देण्याची परंपरा पाळत गरजू बांधवांना मदतीचा हात देण्याचा संदेशही देण्यात आला. तसेच ताडकळस येथील जामा मस्जिदचे शाही इमाम कांजी हाफिज मसूद यांनी देशात सामाजिक एकता, शांतता व बंधुभाव कायम राहावा यासाठी विशेष दुआ केली. यासोबतच भारत देशाच्या रक्षणासाठी कार्यरत असलेल्या सैनिकांच्या सुरक्षिततेसाठीही प्रार्थना करण्यात आली. या नमाज पठण प्रसंगी सभापती बालाजी रूद्रवार, माजी सभापती रंगनाथ भोसले, ग्रामसेवक बी. जी. पांचपुजे, जि.प.सदस्य संजय जल्हारे, मनु पाटील आंबोरे, मारोती अण्णा मोहिते, सुरेश मगरे, बबलू माने, गजानन घोडके, नामदेव कळसाईतकर, प्रल्हाद कानडे, भोलानाथ जाधव, शिवा माने तसेच पंचायत समिती सदस्य ज्ञानोबा घोडके आदींसह अनेक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी ताडकळस पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक गजानन मोरे स्वतः उपस्थित होते व पोलिसांचा चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता. नमाज पठणानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून सामाजिक ऐक्याचा संदेश देण्यात आला. तसेच पत्रकार सुरेश मगरे यांनी दरवर्षीप्रमाणे यंदाही मुस्लिम बांधवांसाठी शरबत वाटपाचा उपक्रम राबवून ईद सणाचा आनंद द्विगुणित केला.

# जनतेचा नेता हरपला;सोनपेठ विकासाचा शिल्पकार काळाच्या पडद्याआड

## सोनपेठच्या प्रगतीसाठी झटणाऱ्या दशरथ सूर्यवंशी पाटील यांचे निधन

**(सिध्देश्वर गिरी / दै.धर्मयोध्दा)**

**सोनपेठ-** तालुक्याचे राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष तथा कृषी उत्पन्न बाजार समितीचे विद्यमान सभापती आणि माजी जिल्हा परिषद सभापती दशरथ सूर्यवंशी पाटील (वय ५६) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या निधनाने सोनपेठ तालुक्यात शोककळा पसरली असून राजकीय,सामाजिक आणि सर्वसामान्य नागरिकांमध्ये हळहळ व्यक्त होत आहे. ते छत्रपती संभाजीनगर येथे खाजगी रुग्णालयात उपचार घेत असतानाच त्यांचे शनिवार मध्यरात्री दिड वाजता निधन झाले.त्यांच्या पश्चात पत्नी एक



मुलगा,दोन मुली,भाऊ माजी सभापती विठ्ठल सूर्यवंशी,बहीण आई असा परिवार आहे.दशरथ सूर्यवंशी पाटील हे केवळ राजकीय पदाधिकारी नव्हते,तर जनतेच्या समस्या समजून घेणारे,त्यावर उपाययोजना करणारे आणि विकासासाठी झटणारे नेतृत्व म्हणून त्यांची ओळख होती.सोनपेठ तालुक्यातील विविध भागांमध्ये असलेला विकासाचा अनुशेष भरून काढण्यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले.विशेष म्हणजे,पूर्वी गंगाखेड तालुक्यात मोडत असलेल्या सोनपेठला स्वतंत्र तालुक्याचा दर्जा मिळावा यासाठी त्यांनी प्रभावी पाठपुरावा केला.त्याचबरोबर सोनपेठ येथे विविध शासकीय कार्यालये,रोजगार आणि मजुरीच्या संधी निर्माण करण्यासाठी त्यांनी घेतलेली पुढाकारपूर्ण भूमिका अत्यंत महत्त्वाची मानली जाते. त्यांच्या नेतृत्वामुळे अनेक विकासकामांना गती मिळाली आणि सामान्य नागरिकांना प्रशासनाच्या सेवा जवळ आल्या.दशरथ पाटील यांची खरी ओळख म्हणजे त्यांची माणुसकी.कोणताही भेदभाव न करता प्रत्येकाला समान वागणूक देणे,प्रत्येकाचा सन्मान राखणे आणि सर्वांना सोबत घेऊन चालणे ही त्यांची कार्यपद्धती होती.त्यामुळेच ते सर्वसामान्य जनतेच्या मनात घर करून राहिले होते.आज त्यांच्या निधनाने सोनपेठ तालुक्याच्या राजकीय व सामाजिक क्षेत्रात एक मोठी पोकळी निर्माण झाली आहे.ही पोकळी कधीही भरून न निघणारी असल्याची भावना सर्व स्तरांतून व्यक्त होत आहे.त्यांच्या पश्चात कुटुंबीयांसह मोठा मित्रपरिवार आणि समर्थक वर्ग आहे.त्यांच्यावर त्यांच्या गावी अंत्यसंस्कार करण्यात आले.

# जालन्यात सोलार क्रांतीची सुरुवात क्रेडाई जालना व ए एस के टाटा सोलार यांची संयुक्त बैठक संपन्न

## टाटा पॉवर सोलार तुमच्या विश्वासाचा ऊर्जास्त्रोत!




**(प्रविण जगताप / दै.धर्मयोध्दा)**

**जालना -** जालना येथील हॉटेल अतिथी येथे ए.एस. के.मल्टिसर्विसेस -टाटा पॉवर सोलार आणि क्रेडाई यांच्या संयुक्त विद्यमाने सोलार सिस्टीम संदर्भात मार्गदर्शनपर बैठक आयोजित करण्यात आली होती.

बैठकीदरम्यान सोलार ऊर्जेचे महत्त्व, वाढती ऊर्जा गरज आणि पर्यावरणपूरक पर्याय म्हणून सोलार सिस्टीमचा वापर यावर सविस्तर चर्चा करण्यात आली.

टाटा पॉवर सोलर कडून उपलब्ध असलेल्या विविध सोलार पर्यायांची माहिती देताना, त्यांच्या जलद सेवा, उच्च दर्जाचे साहित्य, विश्वासार्हता आणि दीर्घकालीन गॅरंटी यावर विशेष भर देण्यात आला. तसेच ग्राहकांच्या गरजेनुसार विविध क्षमतेचे सोलार सोल्यूशन्स उपलब्ध असल्याचे स्पष्ट करण्यात आले.

या बैठकीस ए.एस. के.मल्टिसर्व्हिसेस चे संचालक स्वप्नील कोकाटे , टाटा सोलारचे मकरंद कुलकर्णी , श्रीपाद सातोणकर , मिहीर राघव तसेच विठ्ठल पवार , चेतन मराठे , अविनाश भोसले , अभय कुलकर्णी व इतर सदस्य उपस्थित होते.

बैठकीत सोलार प्रकल्पांच्या अंमलबजावणीसाठी सकारात्मक चर्चा झाली असून, जालना जिल्ह्यात सोलार ऊर्जेच्या वापरास चालना मिळणार असल्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला. ग्राहकांना रो हाऊस, फ्लॅट सोबत सोलार सिस्टीम देण्याचा नवा पर्याय उपलब्ध करून देण्यावर सकारात्मक चर्चा करण्यात आली. सदर बैठकीमुळे जालना जिल्ह्यात सोलार ऊर्जेबाबत जनजागृती वाढून विश्वासार्ह सोलार उपाययोजनांसाठी टाटा पॉवर सोलर हा सक्षम पर्याय म्हणून पुढे येत आहे.